सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
संज्ञापन व वृत्तपत्रविद्या विभाग
प्रवेशपरीक्षा २०१७ (एमजेएमसी)
विभाग दोन (गुण ५०)

सूचनाः १) ही मराठी प्रश्नपत्रिका आहे. तुम्हाला प्रश्नांची उत्तरे फक्त मराठीतूनच लिहावी लागतील.
२) प्रत्येक प्रश्नापुढे दिलेल्या शब्दमर्यादेकडे विशेष लक्ष द्यावे.
३) व्याकरण व शुद्धलेखन यांच्या अचूकतेकडेही लक्ष द्यावे.

प्रश्न १) खालीलपैकी **कोणत्याही एका** विषयावर पाचशे शब्दांचा निबंध लिहा. **(२०)**

१. नोटाबंदीनंतरचे आयुष्य
२. कृषीसंकटातून बाहेर पडण्याचा मार्ग
३. राष्ट्रीय राजकारणाचे बदलते स्वरूप
४. कार्ल मार्क्स आणि त्याचा वारसा
५. मिशन ऑलिंपिक
६. माझ्या आयुष्यातील माध्यमे
७. हवामान बदल आणि जागतिक तापमानवाढ

प्रश्न २) खालीलपैकी **कोणत्याही चार** विषयांवर सुमारे शंभर शब्दांत टीप लिहा. **(२०)**

१. वन रोड, वन बेल्ट
२. दहशतवाद की पर्यटन?
३. मतदानयंत्रांवरच ठपका!
४. चंपारण्य सत्याग्रहाची शताब्दी
५. आषाढी वारी : एक सामाजिक अनुभव
६. अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य
७. बाहुबली
८. दिलीप पाडगावकर

प्रश्न ३) द हिंदूच्या १६ जून २०१७ च्या अंकात टोनी जोसेफ यांचा लेख प्रसिद्ध झाला आहे. त्यातील काही भाग पुढे दिला आहे. **तो वाचून खाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे द्या.** **(१०)**

भारताच्या इतिहासातल्या सर्वाधिक वादग्रस्त आणि काट्यासारख्या रुतलेल्या प्रश्नाचे उत्तर हळूहळू पण निश्चितपणे मिळत आहे. इसवी सनपूर्व २००० ते १५०० या कालावधीत सिंधू संस्कृतीला अस्ताला जात असताना, स्वतःला आर्य म्हणवणाऱ्या व इंडोयुरोपीय भाषा बोलणाऱ्यांच्या टोळ्या भारतात आल्या का आणि त्यांनी सोबत संस्कृत व विशिष्ट सांस्कृतिक परंपरा आणल्या का, हा तो प्रश्न आहे. गुणसूत्रांचा नव्या पद्धतीने व मोठ्या प्रमाणावर अभ्यास करणाऱ्या जनुकीय संशोधनामुळे जगभरातील शास्त्रज्ञ एका स्पष्ट निष्कर्षावर पोहचत आहेत की, 'होय. आर्य भारतात बाहेरून आले.'

या संशोधनाने अनेकांना आश्चर्य वाटेल आणि काहींना मोठा धक्का बसेल. याचे कारण आधीच्या जनुकीय संशोधनामुळे आर्य बाहेरून आले, हा सिद्धान्त सपशेल खोटा ठरत असल्याची मांडणी गेल्या काही वर्षांत पुढे आली होती. खरे तर ज्यांनी मुळातील

शोधनिबंध वाचले आहेत, त्यांना अशा पद्धतीचे विश्लेषण ओढूनताणून करण्यात येत असल्याची शंका होती. परंतु आता 'वाय' गुणसूत्रांच्या (ही गुणसूत्रे वडिलांकडून मुलाकडे संक्रमित होतात.) मोठ्या प्रमाणावरील अभ्यासातून ही मांडणी उद्ध्वस्त होत आहे.

आतापर्यंतचा अभ्यास हा फक्त मातृ गुणसूत्रांच्या (एमटी-डीएनए : आईकडून मुलीकडे संक्रमित होणाऱ्या गुणसूत्रांच्या) अभ्यासावर आधारलेला होता. गेल्या बारा-साडेबारा हजार वर्षांत भारतीयांच्या गुणसूत्रांमध्ये बाहेरचा कोणताही मोठा शिरकाव झाला नसल्याचे त्यातून सूचित होत होते. मात्र, पैतृक म्हणजे 'वाय' गुणसूत्रांच्या अभ्यासातून त्याच्या संपूर्ण विरोधी निष्कर्ष बाहेर येत आहे. वर उल्लेख केलेल्या कालावधीत भारतातील पैतृक गुणसूत्रांमध्ये बाहेरून मोठा शिरकाव झाल्याचा ठोस पुरावा नव्या अभ्यासातून मिळत आहे.

पूर्वालोकन करताना लक्षात येते की, मातृ आणि पैतृक गुणसूत्रांमधील मूलभूत फरक या परस्परविरोधी निष्कर्षांमागे असावा. ताम्रयुगात झालेल्या स्थलांतरांमध्ये लिंगभेद तीव्र स्वरूपाचे होते. वेगळ्या शब्दांत सांगायचे, तर या कालावधीत मुख्यतः पुरूषच स्थलांतर करत होते. ही पार्श्वभूमी लक्षात घेता मातृ गुणसूत्रांच्या अभ्यासातून त्या काळात मोठ्या प्रमाणावर झालेल्या स्थलांतराचे पुरावे आढळले नाहीत, यात आश्चर्य नाही. याउलट पैतृक गुणसूत्रांचा अभ्यास असे सांगतो की, १७.५ टक्के भारतीय पुरुषांमध्ये 'आर-वन ए' नावाने ओळखल्या जाणाऱ्या विशिष्ट वांशिक समूहाची (हॅपलोग्रुप - एका पुरुषापासून उत्पन्न झालेली वंशावळ किंवा गोत्र) लक्षणे आढळतात. सध्या हा वांशिक समूह आपल्याला युरोप आणि मध्य व दक्षिण आशियात आढळतो. पाँटिक व कास्पियन समुद्रालगतच्या गवताळ प्रदेशातून वांशिक समूहाच्या (म्हणजे आर्यांच्या) दोन शाखा विशिष्ट कालावधीत पश्चिमेला (युरोपकडे) आणि पूर्वेला (भारत व दक्षिण आशियाकडे) पसरल्या, असे पैतृक गुणसूत्रांचा अभ्यास आपल्याला सूचित करतो.

पुढील प्रश्नांची उत्तरे द्या. (प्र. १ अनिवार्य आहे. प्र. २ ते ६ मधील कोणत्याही चारांची ४० शब्दांत उत्तरे लिहा.)

१. उताऱ्याला दोन योग्य शीर्षके द्या.
२. आर्यांच्या स्थलांतराचा सिद्धान्त काय आहे?
३. गेल्या काही वर्षांतील प्रचलित समजूत कोणती होती?
४. या समजूतीला आव्हान कसे मिळाले?
५. मातृ गुणसूत्र आणि पैतृक गुणसूत्रांमधील फरक स्पष्ट करा.
६. नव्या जनुकीय माहितीतून कोणते निष्कर्ष संभवतात?